**वाचले :-**

१. मा.आयुक्त सो यांचा दिनांक०९/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/३९२/२०२४
दिनांक०९/०७/२०२४

**विषय :- गट 'ब' ते गट 'क' संवर्गातील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट 'ब' व 'क' संवर्गातील प्रशासकीय व तांत्रिक पदांची भरती प्रक्रिया पुर्ण होवून बहुतांशी विभागांमध्ये कर्मचा-यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत. यास्तव पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील गट 'ब' ते गट 'क' संवर्गातील ज्या अधिकारी व कर्मचा-यांच्या पदोन्नती आदेशामध्ये अधिकारी व कर्मचा-यांच्या कमतरते अभावी पदोन्नतीपुर्व संवर्गाचे कामकाज करण्याबाबत नमुद केलेली अट शिथील करण्यात येत आहे. यापुढे अशा पदोन्नत अधिका-यांनी त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदाचे कामकाज पहावयाचे आहे व पदोन्नतीपुर्व पदाचे कामकाज कायमस्वरुपी निरस्त केलेले आहे याची नोंद घ्यावी. यापुढे पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांचे फक्त पदोन्नती संवर्गातील पदाच्या जबाबदा-या व कर्तव्य पार पाडावीत.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार गट 'ब' 'क' व 'ड' संवर्गामध्ये दिलेल्या तसेच भविष्यात होणा-या पदोन्नतीस परिविक्षाधिन कालावधी अनुज्ञेय राहणार नाही. याची सर्व विभागप्रमुख तसेच संबंधित अधिकारी व कर्मचा-यांनी नोंद घ्यावी.

प्रस्तुत आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी
प्रत- सर्व संबंधित विभाग